Internal circulation 7/12/97

# विषमता निर्मूलन समिती

प्लॉट नं. ८९, न्यू टिंबर मार्केट, भवानी पेठ, पुणे ४११०४२ • फोन : ६५७३०७

जा. क्र. दि. / /१९९

दि.7.12.97

विषमता निर्मूलन शिबीरासाठी आलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो. साधारणतः 4 वर्षांनंतर आपण जमत आहोत. अलिकडच्या काळात अनेक महत्वपूर्ण घटना घडलेल्या आहेत. त्यापैकी बाबरी मशीद पाडाव, मंडल आयोग शिफारशींची अंमलबजावणी, अर्थव्यवहारांतील खाजगीकरण, मुक्ती, जागतिकीकरण, नवतंत्रज्ञानाचा वापर, इ.घटनांचा उल्लेख प्रामुख्याने करता येईल. मात्र या सर्व घडामोडींच्या बरोबरच शोषण वाढले असून, परिणामतः आर्थिक-सामाजिक विषमता पराकोटीला पोचली आहे. आर्थिक विषमतेमुळे राजकीय समतेला केवळ दिखावू स्वरूप आलेले आहे. एकमत-विषमपत अशी अवस्था निर्माण झाली आहे. आर्थिक समृध्दीसाठी आसुसलेपणे बोलणारी मंडळी समतेबद्दल अनाग्रही राहातात असा अनुभव येतो. स्वातंत्र्य-समता-बंधुता ही मूल्ये येथील जनजीवनाने मनोमन अंगिकारिलेली नाहीत. उलट विषमतेला धर्माची पुटे मिळालेली आहेत या वास्तव चित्राबद्दल फारसे दुमत होणार नाही. शोषण व विषमतेविरूध्द लढणा-यांनी परस्परांना समजून घेण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी परस्परांतील संबंधासाठी आचारसंहिता निश्चित करावी लागेल. जात, वर्ग, लिंग, वय इ. निकषांचा विवेकाने वापर करावा लागेल. ज्यायोगे परिवर्तनाची चळवळ तीव्र व परिणामकारक होऊ शकेल. आज आपण फक्त 1 दिवसासाठी एकत्र आलो आहोत. तेही सकाळी 10 ते सायं 6 पर्यंत. यातही एखादा तास जेवणासाठी द्यावा लागेल. उपलब्ध 7 तासात 4 विषयांवर नेमकेपणाने बोलावे लागेल व काही निष्कर्षापर्यंत येण्याचा प्रयत्न करावा लागेल. सर्वांच्या सोयीसाठी आम्ही जात, वर्ग, लिंग, वय या चार ठळक बाबी निश्चित केल्या आहेत. त्याप्रमाणे चर्चासत्रांचे आयोजन केलेले आहे. शिबीरांचे संयोजन व कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

| विषय | संयोजक | चर्चा प्रमुख | वेळ |
|---|---|---|---|
| उद्घाटन | - | डॉ.बाबा आढाव | स. 10 ते 10.15 |
| जात | हरी नरके | डॉ.भारत पाटणकर | स.10.15 ते 12 |
| वर्ग | दत्ता देसाई | श्री. रा. प. नेने | दु.12 ते 1.45 |
| | जेवण - | | दु.1.45 ते 2.30 |
| लिंग | प्रा.प्रतिमा परदेशी | प्रा.पुष्पा भावे | दु.2.30 ते 4.15 |
| वय | नितीन पवार | ॲड राम शरमाळे | दु.4.15 ते 6.00 |

मंडल आयोगाची अंमलबजावणी, वर्गीय, स्त्रीवादी, युवक चळवळींचा नेमकेपणाने मागोवा चर्चासत्रांत घेतला जावा अशी अपेक्षा आहे. शिबीर यशस्वी व्हावे यासाठी आपणां सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

कृपया,
- थोड्या वेळात व मुद्देसूद मांडणी करा.
- पुनरुक्ति टाळा.
- स्वतःच्या कामाच्या वर्णनापेक्षा कामात निर्माण् होणा-या वैचारिक प्रश्नांची मांडणी करा.
- लिखित स्वरूपांत प्रश्न व शंका विचारा.

बा.आढाव

( डॉ.बाबा आढाव )